|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990 'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/आमएस्य-३५/२६४/२०२४ दि.१४/१२/२०२४

प्रति,

१) मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,
विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा.संचालक / विभाग प्रमुख,
विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना -

विषय:- **कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा सहभागाबाबत.....**

संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/१४/विवि-४६/१४४/२०२३, दि.१२/०७/२०२४

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्न क्षेत्रात पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमात नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रगतीच्या आलेखा बरोबरच अभ्यासेत्तर उपक्रमात सहभाग वाढावा या उद्देशाने सर्वांगीन विकास व्हावा. या करीता विद्यापीठ प्राधिकरणाच्या निर्देशानुसार विद्यार्थी विकास विभागामार्फत त्यांच्यासाठी सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, परिसंवाद, कृतीसत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले जात असते.

प्रस्तुत हेतूने आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना आपल्या सुप्त कलागुणांना व अभिनय क्षमतेला अधिक वाव देण्यासाठी रंगभूमीचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या व्यासपीठातून कलाकार, अभिनेते, संगीतकार, दिग्दर्शक व लेखक निर्माण होण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

आपणासं विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा कबचौउमवि विद्यार्थी विकास विभाग आणि **ज. जि. म. वि. प्रसा. सह. समाज मर्या. श्री. एस. एस. पाटील कला, श्री.भाऊसाहेब टी. टी. साळुंखे वाणिज्य आणि श्री. जी. आर. पंडीत विज्ञान महाविद्यालय, जळगाव.(नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव)** यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०१ व ०२ जानेवारी, २०२५ दरम्यान **ज. जि. म. वि. प्रसा. सह. समाज मर्या. श्री. एस. एस. पाटील कला, श्री. भाऊसाहेब टी. टी. साळुंखे वाणिज्य आणि श्री. जी. आर. पंडीत विज्ञान महाविद्यालय, जळगाव** येथे आयोजित करण्यात येत आहे.

कबचौउमवि बहिणाबाई करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा **- पारितोषिक स्वरुप व नियम**

| | | |
|---|---|---|
| एकांकिका सांघिक प्रथम | रु.७,००१/- | चषक, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| एकांकिका सांघिक द्वितीय | रु.५,००१/- | चषक, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| एकांकिका सांघिक तृतीय | रु.३,००१/- | चषक, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| एकांकिका सांघिक उत्तेजनार्थ | रु.२,००१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| **व्यक्तिगत पारितोषिके** | | |
| दिग्दर्शन प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| दिग्दर्शन द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| लेखन प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| लेखन द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| अभिनय पुरुष प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| अभिनय पुरुष द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| अभिनय स्त्री प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| अभिनय स्त्री द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| नेपथ्य प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| नेपथ्य द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |

| | | |
|---|---|---|
| प्रकाश योजना प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| प्रकाश योजना द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| पार्श्वसंगीत प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| पार्श्वसंगीत द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| रंगभूषा प्रथम | रु.५०१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| वेशभूषा द्वितीय | रु.३५१/- | प्रशस्तीपत्र व मानचिन्ह |
| | | |
| अभिनय गुणवत्ता पारितोषिक | रु.१५१/- | एकूण ६ (सहा) व प्रशस्तीपत्र |

## स्पर्धा नियम

१) या स्पर्धेत एका महाविद्यालयातील एकच संघ भाग घेऊ शकेल.

२) प्रत्येक संघाला ६० मिनीटांचा कालावधी दिला जाईल याच वेळेत संघाचा नेपथ्य रचना, प्रकाश योजना व प्रत्यक्ष प्रयोग सादरीकरण अंतर्भूत असेल. दिलेल्या कालावधीतच रंगमंच मोकळा करुन देण्याची जबाबदारी संघाची असेल.

३) सादरीकरणात धर्म,जाती,आस्थेची प्रतिके,महान व्यक्ति यांचा अवमान करणारे शब्द किंवा अश्लिल शब्दाचा वापर करु नये.तसे आढळल्यास सादरीकरण त्याच क्षणी रद्दकरण्याचा अधिकार परीक्षकांना व आयोजक महाविद्यालयास राहील.

४) प्रवेशिका सादर करतांना विहित नमुन्यातील प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांचे पत्र, कलावंत विद्यार्थ्यांची माहिती, लेखकाचे संमती पत्र, तसेच महाराष्ट्र शासनाचे रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे (सेन्सॉरचे) अनुमती प्रमाणपत्र प्रत सोबत सादर करणे आवश्यक आहे. लेखकाचे संमतीपत्र आणि सेन्सॉर प्रमाणपत्र आणण्याची जबाबदारी संघाची असेल.

५) संघातील प्रत्यक्ष रंगमंचावर काम करणाऱ्या विद्यार्थी कलाकाराचे वय हे २५ वर्षापेक्षा जास्त नाही याची पडताळणी केल्यावरच त्याला या स्पर्धेत पाठवावे. मात्र रंगमंचावरील (जसे - लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश योजना, पार्श्वसंगीत, रंगभूषा व वेशभूषा करणारे) कलाकार विद्यार्थ्यांना हा नियम लागू राहाणार नाही.

६) संघातील रंगमंचावरील व रंगमंचा मागील विद्यार्थी कलावंत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात नियमित शिक्षण घेणारा असावा व त्याच्या / तिच्याकडे मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ ग्रंथपाल यांनी स्वाक्षरी केलेले ओळखपत्र असावे.

७) संघातील रंगमंचावर प्रत्यक्षपणे काम करणाऱ्या व रंगमंचावरील विद्यार्थी कलाकारांची कमाल संख्या १६ असावी.

८) स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघाला सादरीकरण व पारितोषिक वितरण समारंभातील सहभागासाठी करावा लागणारा प्रवास, भोजन व निवास इ. साठी लागणारा खर्च सबंधित महाविद्यालयांना करावा लागेल. आयोजक त्यासाठी बांधील नाहीत, तथापि पूर्व सूचना दिल्यास संघ सदस्यांची निवास व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत अल्प दरात होऊ शकेल.

९) स्पर्धेत सघांना आयोजकांद्वारे ६ फूट लांब x ४ फूट रुंद आकाराचे चार चौथरे, ४ मोढे, २ लाकडी टेबल, २ दरवाजा चौकट नेपथ्यासाठी तर प्रकाश योजनेसाठी १२ स्पॉट लाईट विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. या व्यतिरिक्त आवश्यक साहित्य योग्य शुल्क भरुन वापरता येईल. याबाबतची आवश्यक माहिती संघाने आयोजकांना किमान २ दिवस आधी पूर्वसुचना देऊन कळविणे आवश्यक आहे.

१०) स्पर्धेतील प्रयोगाच्या वेळी आधीच्या संघाची एकांकिका लवकर संपली अथवा रद्द झाली तर त्यानंतर पाच मिनिटांत रंगमंच पुढील स्पर्धक संघाला दिला जाईल. यासाठी सबंधित सघांना दिलेल्या दिवशी संपूर्ण सत्राच्या प्रारंभापासून उपस्थित असणे गरजेचे आहे.

११) स्पर्धेत संघामुळे वा संघाच्या पाठीराख्यांमुळे (प्रोत्साहनकर्त्या) कोणताही व्यत्यय येणार नाही याची काळजी संघ व्यवस्थापकाने घ्यावयाची आहे. सदर कालावधीत संघ अथवा त्याच्या पाठीराख्यांकडून नियमबाह्य वर्तन झाले अथवा वादविवाद झाल्यास पारितोषिकासाठी त्या संघाचा विचार केला जाणार नाही.

१२) लेखनाचे पारितोषिक हे विद्यार्थी लेखकांनाच देण्यात येईल.

१३) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व स्पर्धक संघानां मान्य असेल, त्याबाबत कोणतीही चर्चा केली जाणार नाही.

१४) स्पर्धकांना आयोजकांद्वारे निश्चित वेळ दिली जाईल, त्यावेळेस स्पर्धक संघ उपस्थित नसल्यास प्रयोग रद्द केला जाईल व तो संघ स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

१५) प्रवेशिकेसोबत **प्रवेश शुल्क रु.२५०/-** (रुपये दोनशे पन्नास मात्र) रोख / धनाकर्ष (डी.डी.) अथवा धनादेश (चेक) द्वारे मा.प्राचार्य, ज.जि.म.वि.प्रसा.सह.समाज मर्या. श्री.एस.एस.पाटील कला, श्री.भाऊसाहेब टी.टी.साळुंखे वाणिज्य आणि श्री. जी. आर. पंडीत विज्ञान महाविद्यालय, जळगाव (नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव) यांच्या नावे **दि. ३० डिसेंबर २०२४** पर्यंत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवावा.

१६) स्पर्धा विजेता स्पर्धक / संघ यांचेबाबत आक्षेप निर्माण झाल्यास व तो वैध ठरल्यास त्यांना प्रदान करण्यात आलेले पारितोषिक रक्कम, प्रशस्तीपत्र व मानचिन्ह परत घेण्यात येतील. तसेच संबधित स्पर्धक व संघ महाविद्यालय कार्यवाहीस पात्र राहील.

सदर स्पर्धेमध्ये आपला संघ सहभागी होण्यासाठी प्रवेशिका, एकांकिकेची संहिता, आवश्यक हमीपत्रे आदी दि. ३० डिसेंबर २०२४ पूर्वी / पर्यंत स्पर्धा आयोजकांकडे फॅक्स क्र.०२५७-२२३५७८१ / jdmvp.prin@gmail.com या ईमेलवर वा टपालाने पाठवावी.

- **स्पर्धेच्या अधिक माहिती व संपर्कासाठी संपर्क दूरध्वनी क्रमांक :-**

१) मा. प्राचार्य डॉ. लक्ष्मण प्र. देशमुख, - ०२५७-२२३६०३४, ईमेल -jdmvp.prin@gmail.com,

२) डॉ.नंदकुमार जा.पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी - ९९२३९६७८४४

कळावे,

आपला विश्वासू,

16-12-2024

(डॉ. जयेंद्र दि.लेकुरवाळे)

**संचालक, विद्यार्थी विकास**

* सोबत :- प्रवेशिका

* प्रत माहितीसाठी :-

१. **मा. प्राचार्य,** ज.जि.म.वि.प्रसा.सह.समाज मर्या. श्री.एस.एस.पाटील कला, श्री.भाऊसाहेब टी.टी.साळुंखे वाणिज्य आणि श्री. जी. आर. पंडीत विज्ञान महाविद्यालय, जळगाव

२. डॉ.संजय काशिनाथ पाटील, जळगाव जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, पंकज महाविद्यालय, चोपडा, जि.जळगाव.

३. डॉ.विवेकानंद लक्ष्मण चव्हाण, धुळे जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, एस.पी.डी.एम.महाविद्यालय, शिरपूर, जि.धुळे.

४. डॉ.विजयप्रकाश ओमप्रकाश शर्मा, नंदूरबार जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, पी.एस.जी.व्हि.पी.एम.एस.महाविद्यालय, शहादा, जि. नंदूरबार.

५. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

६. मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

७. मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

८. मा.जनसंपर्क अधिकारी, कृपया सदरची बातमी प्रसिध्दी बाबत कार्यवाही करावी.

Z:\\xpdata/mpp/Umavi Karandak spardha 24-25